ISSN 2349-638x
Impact Factor 6.293

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

PEER REVIEW & INDEXED JOURNAL
Email id : aiirjpramod@gmail.com
www.aiirjournal.com

## SPECIAL ISSUE No. 64

Executive Editor
Dr. S.M. Maner
Principal
Tuljabhavani Mahavidyalaya,
Tuljapur, Dist. Osmanabad (M. S.)

Co-Editor
Dr. S.M.Deshmukh
Head, Dept. of Marathi
Tuljabhavani Mahavidyalaya,
Tuljapur, Dist. Osmanabad (M. S.)

Chief Editor
Prof. Pramod Tandale

Impact Factor - 6.293 ISSN-2349-638x

# Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

JANUARY – 2020

**Executive Editor**

**Dr. S. M. Maner**
Principal
Tuljabhavani Mahavidyalaya, Tuljapur,
Dist. Osmanabad (M. S.) India

**Chief Editor**

**Pramod P. Tandale**

**Co-Editor**

**Dr. S. M. Deshmukh**

Head, Dept. Marathi

Tuljabhavani Mahavidyalaya, Tuljapur, Dist. Osmanabad (M.S.) India

**IMPACT FACTOR**

**SJIF 6.293**

For details Visit our website

www.aiirjournal.com

Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
Impact Factor – 6.293

Special Issue 64 Editorial Board

## Advisory Board

**Prin. Dr. Milind Hujare**, Vasantrao Dada Patil Mahavidyalaya, Tasgon

Prin. Dr. Anil Patil, A. K. M. M. Ichalkaranji

**Prin. Dr. Babasaheb Dudhale**, Dr. Patangrao Kadam Mahavidyalaya, Pen

**Prin. Dr. Samad Shaikh**, Ex Principal, Vasantrao Naik College, Aurangabad

**Prin. Dr. S. Y. Hongekar**, Vivekanand College, Kolhapur

**Prin. Dr. R. R. Kumbhar**, Dattajrao Kadam Mahavidyalaya, Ichalkaranji

**Prin. Dr. S. B. Kurane**, Samajbhushan Ganpatrao Kalbhore Mahavidyalaya, Lonikalbhore

## Review Committee

### Dept. of Marathi

Prin. Dr. Haridas Phere, Dhoki

Dr. Shirish Landage Patil,Newasa

Dr. D. R. Gaikwad, Solapur

Dr.Nanasaheb Suryawanshi, Loha

### Dept. of Hindi

Dr. Arjun Chavan, Kolhapur

Dr. D. Y. Ingale, Osmanabad

Dr. Ashok Marde, Tuljapur

Dr. M. R. Ade, Tuljapur

### Dept. of English

Ex Prin. Dr. F. A. Siddikui, Bidkin

Dr. S. S. Kanade, Murum

Dr. C. R. Dapke, Tuljapur

Dr. Farjana M. Tamboli, Tuljapur

| Sr No | Author Name | Title of Article / Research Paper | Page No. |
|---|---|---|---|
| 121 | डॉ. प्रताप मारूती गायकवाड | भाषा आणि प्रसारमाध्यमे ( मुद्रित व दृष्य माध्यमे ) | 336 |
| 122 | प्रा. मधुकर बालासाहेब जाधव | मुद्रितशोधन व रोजगाराच्या संधी | 340 |
| 123 | कविता ठोंबरे | मुद्रित शोधन | 342 |
| 124 | प्रा. डॉ. बी. बी. खंदारे | मुद्रितशोधन आणि भाषालेखन व्यवहार | 343 |
| 125 | डॉ. किरण आगतराव जगदाळे | मुद्रितशोधन | 345 |
| 126 | केशरचंद नारायण राठोड | मुद्रितशोधन | 348 |
| 127 | डॉ. जी. एस. क्षिरसागर | मुद्रित माध्यमासाठी लेखन कौशल्य | 354 |
| 128 | प्रा. शिवाजी संभाजी गायकवाड | मराठी व अन्य संकेतस्थळावरील रोजगाराच्या संधी | 356 |
| 129 | प्रा. डॉ. शिवाजी पिराजी जगतवाड | स्तंभलेखन व स्वरूप | 358 |
| 130 | सौ. पद्मावती प्रभाकर पाटील | वृत्तपत्रीय - अग्रलेख लेखन | 360 |
| 131 | प्रा. डॉ . सहदेव विलासराव रसाळ | पटकथा लेखन संकल्पना : स्वरूप, प्रकार आणि वैशिष्ट्ये | 363 |
| 132 | प्रा. संस्कृती सचिन पाचकुडे | भाषाभ्यास : अनुवाद क्षेत्र | 366 |
| 133 | सागर रघुनाथसुरवसे | मराठी भाषा व अनुवाद क्षेत्रातील रोजगाराच्या संधी | 369 |
| 134 | श्री. बबन नामदेव गायकवाड | भाषाभ्यास : अनुवाद क्षेत्र | 371 |
| 135 | प्रा.नानासाहेब गव्हाणे | भाषा अभ्यासातील रोजगाराभिमुख क्षेत्र : अनुवाद | 374 |
| 136 | प्रा. डॉ. निलेश एकनाथराव लोंढे | अनुवाद क्षेत्रातील रोजगाराच्या संधी | 376 |
| 137 | प्रा. विनय माडगावकर | भाषांतरातून अर्थार्जन | 380 |
| 138 | प्रा. श्री. जितेंद्र शरणप्पा बिराजदार | नाटक आणि भाषांतर प्रक्रिया | 383 |
| 139 | प्रा. अनुराधा लक्ष्मणराव पाटील | भाषाभ्यास – अनुवाद क्षेत्र | 385 |
| 140 | प्रा. डॉ. इजा तांबोळी | अनुवाद : समस्या आणि उपाय | 387 |
| 141 | डॉ. सुरेश शिंदे | अनुवाद आणि व्यवसायाच्या संधी | 390 |
| 142 | प्रा. राजा निवृत्तीजगताप | सूत्रसंचालन: एक व्यावसायिक कला | 393 |

# पटकथा लेखन संकल्पना : स्वरूप, प्रकार आणि वैशिष्ट्ये

**प्रा. डॉ . सहदेव विलासराव रसाळ**
सहाय्यक प्राध्यापक मराठी विभाग
व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय
उस्मानाबाद

**प्रस्तावना :-**

कथा ही चित्रपटाचा मूळ पाया असते. एकूणच चित्रपटांची कमान कथेशी निगडीत असते म्हणून पटकथा लेखनाला विशेष महत्व असते. पटकथेच्या लेखनासाठी कथा, कादंबरी, नाटक अशा वाङ्मय प्रकाराचाही आधार घेतला जातो. या वाङ्मय प्रकाराच्या आधारावर उत्तम पटकथा तयार केली जाते. पटकथा सरस असेल तर चित्रपटही दर्जेदार बनतो. म्हणून चित्रपटाच्या उभारणीत पटकथेची विशेष भूमिका असते. चित्रपट हे दृकश्राव्य माध्यम असल्यामुळे पटकथा ही या माध्यमाला प्रवाहीपणाने पुढे नेणारी असते. यासाठी पटकथालेखक सर्व बारकाव्यांसह पटकथा लेखन करत असतो पटकथा ही चित्रपटासाठी असो की मालिकेसाठी असो दोन्ही ठिकाणी पटकथा लेखकाला प्रेक्षकांच्या अभिरुचीचा विचार करावा लागतो. प्रेक्षकांच्या पसंतीस उतरणारी पटकथा जन्माला घालत असताना त्याला वेगवेगळे प्रयोग करावे लागतात. यातूनच सरस अशी पटकथा आकारास येते.

**पटकथेची संकल्पना :-**

पटकथा ही दृकश्राव्य माध्यमांशी निगडीत असल्यामुळे मोठ्या कौशल्यातून ती आकारास आलेली असते. साहित्याचे माध्यमांतर घडवून आणण्यात पटकथेचा खूप मोठा वाटा असतो. चित्रपटकथा, दूरचित्रवाणीवरील मालिका, नभोवाणीवरील श्रुतिका आणि नभोनाट्य इत्यादी नभोनाट्याचे महत्त्वाचे प्रकार आहेत. साहित्याच्या शाब्द माध्यमाला दृकश्राव्य माध्यमातून साकार करण्याचे महत्त्वाचे आव्हान पटकथा पेलत असते. कथा वा कादंबरी वाचनातून कलाकृतीचा अनुभव घेणे आणि दृकश्राव्य माध्यमातून जन्मास आलेल्या चित्रपटाची अनुभूतीघेणे यात फरक असतो. हा फरक आपल्या लक्षात येण्यास मदत होते

आपण पाहू शकतो व ऐकू शकतो आणि कॅमेऱ्याद्वारे चित्रित करून पडद्यावर दाखवली जाऊ शकते. अशा कथेस पटकथा म्हणता येईल. चित्रपटासाठी कौशल्यपूर्ण आणि कलात्मकरीत्या तयार केलेली कथा म्हणजेच पटकथा होय. पटकथेचे निर्माण होत असताना कथा, कादंबरी, कथा, काव्य यांचा आधार घेऊन तिच्यावर चित्रपट सदृश्य संस्कार करून पटकथेची निर्मिती करता येते. पटकथा लेखन करणे हे एक मोठे कौशल्यपूर्ण काम आहे. कोणत्याही चित्रपटाचे यशापयश हे पटकथेवर आधारित असते. साहित्याची निर्मिती करत असताना साहित्यिक आपले जीवनानुभव, भाव-भावना, कल्पनाविश्व आणि विचारविश्व कथेतून मांडत असतो, परंतु पटकथा लेखकाला प्रेक्षक डोळ्यासमोर ठेवून पटकथेची निर्मिती करावी लागते. संवादाला दृश्याच्या माध्यमातून साकार करण्याचे अवघड काम पटकथाकारास पेलावे लागते. सुरुवात, मध्य आणि शेवट हा आकृतिबंध कायम ठेवून बहुविध प्रयोग करत करत प्रेक्षकांच्या पसंतीस उतरण्याचे महत्त्वाचे आव्हान पटकथाकाराला पेलावे लागते. कथा ही भूतकाळातील घडलेल्या घटनांना बद्ध करण्याचे काम करते तर पटकथा ही भूतकाळातील घटनांना वर्तमानाची जोड देऊन साकार होण्याची किमया घडवत असते. पटकथेतून लेखक दिग्दर्शकांच्या सूचना मान्य करीत नवे विलोभनीय विश्व निर्माण करीत असतो. पटकथेच्या माध्यमातून मूळ कथेचा विस्तार करण्यात येतो. घटना-प्रसंग यांची क्रमानुरूप रचना करत कथेचा आशय खुलवत चित्रपटाला गती देण्याचे काम करण्यात येते. अशा पद्धतीने हेतुपुरस्सरकरण्यात आलेल्या कथालेखनास पटकथा म्हणता येईल.

**पटकथेचे स्वरूप :-**

पटकथेकडे चित्रपटाची एक दृश्यसंहिता म्हणून पाहता येते. या लिखित दृश्यसंहितेशिवाय चित्रपट तयार होणे ही अशक्य अशी बाब आहे. याला जोडूनच कॅमेरा आणि अन्य तांत्रिक घटकांच्या आधाराने चित्रपटाची किमया साधलेली असते. अशा प्रकारचे चित्रपटाचे स्वरूप असले तरी परिणामकारक आणि प्रभावी कथानकाचा आधार असल्याशिवाय उत्तम चित्रपट बनणे अशक्य असते. म्हणून चित्रपटाच्या निर्मितीत मूळ कथानकाला आणि तिच्या पटकथेला महत्त्वाचे स्थान असते. रंजन आणि उद्बोधन ही मुख्य उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून चित्रपटाचे निर्माण झालेली असते. चित्रपटाच्या उदयातूनच पटकथेचा जन्म झालेला आहे. आपणास चित्रपटाच्या तुलनेत कोणत्याही साहित्य प्रकारात एखाद्या विषयाची व्यापकता मांडता येणार नाही, असे व्यापक माध्यम म्हणून चित्रपटाकडे पाहता येईल. या चित्रपटाच्या निर्मितीत पटकथेची भूमिका अनन्य साधारण अशी आहे.

एकूणच पटकथेच्या लेखनाबाबतीत विचार केला तर आरंभीच्या काळात पटकथालेखन हे गांभीर्यपूर्वककेले जात नव्हते. चित्रपटाच्या विकासाच्या टप्प्यात पटकथेचे महत्त्वाचे स्थान आहे. हे नंतरच्या काळात या क्षेत्रातील तज्ज्ञांच्या लक्षात आले.

कॅमेऱ्याएवढेच महत्त्व पटकथेला आहे. कोणताही चित्रपट सुरुवातीला कागदावर साकार होतो आणि त्यानंतर पडद्यावर येतो. यामुळेच पटकथा लेखनाच्या संदर्भाने जागरूक दृष्टिकोन तयार झालेला दिसतो.

**पटकथेचे प्रकार :-**

चित्रपट ही प्रमुख्याने मिश्रकला म्हणून ओळखली जाते. कथालेखक, पटकथाकार, संवादलेखक, दिग्दर्शक, संपादक, संकलक, छायाचित्रकार, संगीतकार इत्यादींचा यात समावेश असतो. या सर्वांच्या समन्वयातून उत्तम चित्रपटाची निर्मिती होते. या सर्व समन्वयातून निर्मलकुमार चौधरी या अभ्यासकांनी त्यांच्या 'How to write film screenplays' या ग्रंथात पटकथेच्या तीन प्रकाराविषयी चर्चा केली आहे.

1. प्रपोजल स्क्रिप्ट
2. शूटिंगस्क्रिप्ट
3. पोस्ट प्रोडक्शन स्क्रिप्ट

या तीन पटकथेच्या अवस्था म्हणनेच येथे संयुक्तिक ठरेल. कोणत्याही कथेच्या अनुषंगानेपटकथा निर्माण करीत असताना पटकथाकार एकूणच चित्रपटाची दृश्यकल्पना डोळयासमोर ठेवूनच पटकथेची निर्मिती करतो. निर्माता, दिग्दर्शक, संकलक आणि संपादक या सर्वांच्या कलात्मक आणि व्यावहारिक गणितातूनच पटकथा आकार घेते. यावेळेस तिच्या अवस्थेत बहुविध बदल घडत राहतात. त्या अवस्था म्हणजेच उपरोक्त प्रकार होय

**पटकथेची वैशिष्ट्ये :-**

पटकथा ही चित्रपटाच्या निर्मितीत खूप महत्त्वाची भूमिका निभावत असते. उत्तम पटकथेतच उत्तम चित्रपटाचे गमक दडलेले असते. अशा या सरस पटकथांची काही स्वतःची वैशिष्ट्ये असतात. त्यांचा विचार आपण येथे करणार आहोत.

**कथा व पटकथा :-**

पटकथेची निर्मिती ही कोणत्यातरी कथेचा आधार घेऊनच होत असते. कथा ही व्यक्तिरेखांचा विकास, कथानकाचा विकास आणि वाचकाचे समाधान या तीन अवस्था घेऊन वाटचाल करीत असते. या तीन अवस्थांना सुयोग्य पद्धतीने दृश्य बद्ध करण्याचे काम पटकथेचे असते. कथेतील आशयाला अधिक जिवंतपणे प्रेक्षकांसमोर मांडण्याचे काम पटकथा ही करीत असते.

**नाट्यमयता :-**

कथेत दडलेल्या नाट्यमयतेला पटकथेच्या माध्यमातून साकार करण्याचे काम पटकथाकार करीत असतो. चांगल्या चित्रपटाच्या निर्मितीत चांगल्या पटकथेची भूमिका महत्त्वाची ठरत असते. मुळात पटकथाच उत्तम नसेल तर उत्तम चित्रपटही साकार होऊ शकत नाही. पटकथा चांगली म्हणजे काय तर पटकथेला असलेले नाट्यमय रूप हेच तिला उंची प्राप्त करून देत असते. पटकथा ही कागदावर आवतरत असताना सर्जनशील स्वरूप घेऊन साकार होतेच पण व्यावसायिक दृष्टिकोन घेऊनही जन्माला येत असते.

**चित्रपटाचा आशय :-**

कोणतीही पटकथा साकार होत असताना कोणत्या तरी पटकथेचा आधार घेऊनच तयार होत असते. सूत्रबध्द निर्मिती डोळयासमोर ठेवतच पटकथेची निर्मिती केली जाते. पटकथेचा आराखडा आखत असताना दृश्यसंपादन, संवाद, गीते, ध्वनीसंयोजन या विविध घटकांचे स्थान विचारात घेऊन पटकथा पुढे वाटचाल करते. मूळ कथेच्या आशयाला जपण्याचे आव्हान पेलतच पटकथाकार पटकथेची निर्मिती करतो. बऱ्याच कथेच्या मूळ गाभ्यात झालेला बदल हा माध्यमांतराची गरज लक्षात घेऊनच झालेला असतो.

**भावनांची निर्मिती :-**

पटकथा ही चित्रपटाच्या माध्यमातून बहुविध भावनांची निर्मिती करण्याचे काम करते. अनुकूल भावनांची निर्मिती करणे हे सर्वस्वी उत्तम पटकथेवर अवलंबून असते. व्यक्तिरेखा विषयी अनुकूल व प्रतिकूल भावाच्या निर्माणात कथेचा आशय महत्त्वाचा हातभार लावत असतो. चित्रपट ही वास्तविक पाहता चलत चित्रांची मालिका असते. यातून असंख्य दृश्य प्रेक्षकांच्या नजरेसमोरून वेगाने जातात. या सर्वच दृश्यांना आशयाची जोड देऊन उत्तम आशय संगती प्राप्त करून देणे ही ही आवश्यक बाब असते.

**दृष्यमयता :-**

पटकथा लेखन करताना पटकथाकारास कथेतील बहुविध अवस्थांचे सूक्ष्म चिंतन करून चित्रांची उत्तम दृश्य मालिका तयार करावी लागते. हे खूप मोठे आव्हानात्मक काम त्याला पेलावे लागते. कथेची निर्मिती करत असताना उत्तम व्यक्तिरेखा उभा करण्याची जशी गरज असते तसे उत्तम चित्रपटाच्या निर्मितीसाठी उत्तम दृश्याची निर्मिती करणे गरजेचे असते. ज्या कथेत दृश्यमूल्ये

असतात, त्याच कथेचे उत्तम पटकथेत रूपांतर होत असते. ज्या पटकथेत दृश्यांची उत्तम पद्धतीने मांडणी केलेली असते, तो चित्रपट प्रभावी होतो.

**समारोप :-**

प्रस्तुत लेखनातून पटकथेची संकल्पना स्वरूप, प्रकार आणि वैशिष्ट्ये यांचा स्थूल अभ्यास करण्यात आला आहे. पटकथा म्हणजे काय, तिची संकल्पना कशी आकारास आली, पटकथेचे स्वरूप ढोबळ मानाने कसे अभ्यासता येईल, पटकथेचे प्रकार कोणकोणते आहेत आणि पटकथेची वैशिष्ट्ये कोणती आहेत याचा अभ्यासपूर्ण आढावा येथे घेण्यात आला आहे.

**आधारभूत ग्रंथसूची:-**


1. साहित्यकृतींचे माध्यमांतर : (संपा.डॉ. भारत हंडीबाग, डॉ.सदाशिव सरकटे) हरणाई प्रकाशन, नांदेड, प्रथमावृत्ती 2015
2. भारतीय सिने सिद्धांत : अनुपम ओझा, राधाकृष्ण प्रकाशन, जगतपुरी दिल्ली, संस्करण पहला, 2002.
3. पटकथा - तंत्र व मंत्र : ए.जी.दिवान
4. मराठी चित्रपटाची पटकथा : अनिल सपकाळ, अनुबंधप्रकाशन पुणे 2012
5. मराठी कलाभिरुची : (संपा. वि.भा.देशपांडे, सुषमा जोगळेकर) कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे आवृत्ती पहिली 2000
6. सिनेमाची भाषा : डॉ.मनीषा कावतकर
7. माध्यमांची भाषा आणि लेखन कौशल्य: डॉ. केशव तुपे